# घरातील विलगीकरण कक्षाच्या मार्गदर्शक सुचना

प्रवासाशी संबधित असलेली किंवा नसलेली नोव्हेल कोरोना व्हायरस (कोविड -१९) चा संशयीत रुग्ण सापडल्यानंतर त्याचे नियुक्त केलेल्या आरोग्य केंद्रामध्ये विलगीकरण करण्यात यावे आणि रुग्णाच्या सर्व निकट सहवासीतांची लाईन लिस्ट बनवण्यात यावी. घराच्या स्तरावरील विलगीकरण संशयीत किंवा दुषीत रुग्णाच्या सहवासात आलेल्या सर्व सहवासीतांना लागु होईल.

हि उपाययोजना भारतामध्ये सुरवातीच्या टप्यात खालील वेळी लागु होईल.

१. प्रवासाशी संबधीत रुग्ण

२. प्रवासाशी संबधीत अथवा संबंध नसलेल्या रुग्णापासुन तयार झालेला समुह जेथे क्लस्टर कंटेनमेंट धोरण लागु आहे.

३. कोविड -१९ प्रभावीत भाग जेथे स्थानीक आणि समुदायामध्ये रोगाचा प्रसार होत आहे.

## संपर्काची व्याख्या

संपर्काची व्याख्या म्हणजे असा निरोगी व्यक्ती जो जंतुसंसर्ग झालेल्या व्यक्तीच्या किंवा दुषीत वातावरणाच्या संपर्कात येतो आणि त्यामुळे त्याला जंतुसंसर्गाचा धोका आधिक वाढतो.
कोविड -१९ च्या संदर्भामध्ये सहवासीत म्हणजे

- कोविड -१९ ग्रस्त रुग्णाच्या बरोबर एकाच घरात राहणारी व्यक्ती.
- कोविड -१९ ग्रस्त असलेल्या रुग्णाच्या संसर्गजन्य शारीरीक स्त्रावांशी कोणतेही वैयक्तीक संरक्षणात्मक उपकरणे (पीपीई) न वापरता संपर्कात आलेला व्यक्ती.
- कोविड -१९ग्रस्त रुग्णाशी बंदिस्त वातावरणात संपर्कात आलेला व्यक्ती, समोरासमोर संपर्कात आलेला व्यक्ती, एक मिटर अंतरामध्ये संपर्कात आलेला व्यक्ती (विमानप्रवासाचा देखील समावेश)

## घरात विलगीकरण कक्ष करण्याची सुचना

घरात विलगीकरण केलेल्या व्यक्तीने हवेशीर आणि वेगळी खोली ज्याला संडासबाथरुम जोडलेले आहे अशा खोलीमध्ये रहावे. जवळचे नातेवाईक जर त्या खोली मध्ये राहणार असेल तर त्यानी रुग्णापासुन कमीत कमी एक मिटर अंतरावर रहावे.

- अशा व्यक्तीने घरातील वृध्द, गर्भवती स्त्री, लहान मुले व प्रतिकार शक्ती असलेल्या व्यक्तीच्या संपर्कात येऊ नये.
- अशा व्यक्तीने घरातील त्यांचा वावर सिमीत ठेवावा.
- अशा व्यक्तीने कोणत्याही परीस्थितीत सामाजीक किंवा धार्मीक कार्यक्रम जसे कि लग्न, अत्यंसंस्कार ई ठिकाणी जाणे कटाक्षाने टाळावे.

### अशा व्यक्तीने सार्वजनीक आरोग्याच्या दृष्टीने खालील सुचना पाळाव्यात.

- अशा व्यक्तीने अल्कोहल युक्त हॅन्ड सॅनीटायझर किंवा साबण आणि पाण्याने वारंवार व्यवस्थित हात धुवावेत.
- अशा व्यक्तीने वापरलेले ताट, वापरलेले पाण्याचे ग्लास, कप, जेवणाची भांडी, टॉवेल, पांघरुण, गादी आणि इतर दैनंदिन वापरातील घरगुती वस्तु घरातील इतर व्यक्तींना वापरण्यास देऊ नये.

Scanned by CamScanner

- अशा व्यक्तींनी पुर्ण वेळ सर्जीकल मास्कचा वापर करावा. मास्क दर ६ ते ८ तासांनी बदलावा आणि वापरलेल्या मास्कची योग्य प्रकारे विल्हेवाट लावावी. डिस्पोजेबल मास्क पुन्हा वापरु नयेत
- अशा व्यक्तींने/ त्यांची सुश्रूषा करणाऱ्या व्यक्तीने/ निकट सहवासीतांनी घरातील सुश्रूषे दरम्यान वापरलेले मास्क ५ टक्के ब्लिच सोल्युशेन किंवा १ टक्के सोडीयम हायपोक्लोराईट द्रावणामध्ये निर्जंतुक करुन त्याची जाळुन विल्हेवाट लावण्यात यावी.
- वापरलेला मास्क हा जंतुसंसर्ग युक्त समजावा.
- अशा व्यक्तींना जर खोकला, ताप, श्वसनाचा त्रास/ धाप लागणे अशी लक्षणे आढळल्यास मनपा आरोग्य विभागाशी (६७३३११११/ ६७३३१५५६) किंवा ०११-२३९७८०४६ वर संपर्क साधावा.

## घरी विलगीकरण केलेल्या करोना ग्रस्त रुग्णाच्या नातेवाईकासाठी सुचना

- शक्यतो एकाच नातेवाईकाने अशा व्यक्तीची सृश्रुषा करावी.
- अशा व्यक्तींच्या शरीराशी थेट संपर्क येणे टाळावे आणि त्यांचे वापरलेले कपडे झटकु नये.
- घरातील विलगीकरण कक्षाची स्वच्छता करताना किंवा अशा व्यक्तींचे वापरलेले कपडे हाताळताना डिस्पोजेबल ग्लोव्हजचा वापर करावा.
- डिस्पोजेबल ग्लोव्हज काढल्यानंतर हात स्वच्छ धुवावेत.
- नातेवाईक आणि अभ्यागतांना अशा व्यक्तींना भेटुन देऊ नये.
- घरातील विलगीकरण कक्षामध्ये ठेवलेल्या व्यक्तींना जर कोविड -१९ लक्षणे आढळुन आली तर त्याच्या निकट संपर्कात आलेल्या सर्व व्यक्तींना १४ दिवस घरातील विलगीकरण कक्षात ठेवावे व पुढील १४ दिवस किंवा अशा व्यक्तीचा प्रयोगशाळा रिपोर्ट निगेटीव्ह येईपर्यंत त्याचा पाठपुरावा करावा.

## घराच्या स्तरावरील विलगीकरण कक्षाची स्वच्छता

- घरात केलेल्या विलगीकरण कक्षातील असलेल्या व्यक्तीच्या खोलीमधील वारंवार हाताळल्या जाणा-या वस्तुंचे (फर्नीचर, बेड फ्रेम, टेबल) १ टक्के सोडीयम हायपोक्लोराईट द्रावणाने निर्जंतुकीकरण करावे.
- शौचालयाची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण घरगुती ब्लिच किंवा घरगुती फिनायलने करावे.
- अशा व्यक्तींचे संपर्कात आलेली कपडे, अंथरुण पांघरुन हे घरातील डिटरजंट वापरुन, वेगळे स्वच्छ धुवून वाळवावे.

## घराच्या स्तरावर विलगीकरणाचा कालावधी

कोविड -१९ ग्रस्त रुग्णाच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींसाठी घराच्या स्तरावरील विलगीकरणाचा कालावधी १४ दिवस असेल किंवा संशयीत रुग्णाचे (जो की इंडेक्स केसच्या संपर्कात आलेला आहे) लॅब रिपोर्ट निगेटीव्ह आल्यास हा कालावधी कमी असेल.

Scanned by CamScanner